राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांनी अर्ज क्र.२०१/२००३ (अर्ज क्र.३६/२०११) मध्ये संबंधित प्राधिकरणाने वाहनांमध्ये लावण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि /किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची योग्य ती मानके अधिसूचीत करण्याच्या दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने दि.३१ जुलै, २०१४ रोजी शासन राजपत्र, भाग-चार-ब नुसार राज्यातील वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि / किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची मानके व त्यांचा वापर याबाबत अधिसूचना प्रकाशित केली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

---

क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.७१/तां.क.१,
पर्यावरण विभाग, १५ वा मजला,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय,
मुंबई-४०००३२.
दिनांक - १६ ऑगस्ट, २०१४.

उपरोक्त अधिसूचनेची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(डॉ.भ.ना.पाटील)
संचालक (पर्यावरण), महाराष्ट्र शासन

प्रति,

प्र.क्र.७१

500



## पर्यावरण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै २०१४

### अधिसूचना

**राज्यातील वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची मानके व त्यांचा वापर.**

क्र. MIS/२०१४/CR-७१/TC १:— ज्याअर्थी, दाट लोकवस्ती आणि वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे राज्यातील शहरांमध्ये वाहनांच्या वाढलेल्या वर्दळीमुळे ध्वनी प्रदूषणाची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे ;

आणि ज्याअर्थी, वाहनांच्या भोंग्यांमुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या ध्वनीची पातळी पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आणि जैवविविधतेने अच्छादीत नैसर्गीक परिसरावर विपरीत आघात करते ;

आणि ज्याअर्थी, अतिकर्कश भोंग्यांच्या ध्वनीमुळे शहरातील मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांच्या अहवालानुसार आणि न्यायालयाच्या यासंदर्भातील वेगवेगळ्या निर्देशानुसार वाढत्या ध्वनी प्रदूषणामुळे लोकांची सर्वसाधारण नाराजी स्पष्ट होत आहे ;

आणि ज्याअर्थी, राष्ट्रीय हरित लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांनी अर्ज क्र. २०२/२००३ (अर्ज क्र. ३६/२०११) मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे संबंधीत प्रधिकरणाने वाहनांना लावण्यात येणारे सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स याकरिता योग्य ती मानके अधिसूचित करण्यास निर्देशीत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य सरकारवर वाहनांमधून निघणाऱ्या ध्वनीची पातळी कमी करण्याकरिता (हॉर्न्स वाजविणे वगैरे) योग्य त्या सर्व उपाययोजना करण्याची जबाबदारी नियम ३(३) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० प्रमाणे सोपविण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कलम १७(१)(जी) अन्वये हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ प्रमाणे प्राधिकृत केल्याप्रमाणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाशी सल्लामसलत करून, सायरन किंवा मल्टीटोन हॉर्न्स आणि वेगवेगळ्या आवाजांचे संदेश याबाबत योग्य ती मानके महाराष्ट्र राज्यात चालणाऱ्या वाहनांसाठी, राष्ट्रीय हरीत लवादाच्या अर्ज क्र. ३६/२०११ मधील दिनांक ९ जानेवारी २०१३ च्या आदेशाद्वारे निश्चित केलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक सूचना देऊन सर्व संबंधीतांच्या हरकती/सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ३१ जानेवारी २०१४ पूर्वी मागविलेल्या होत्या आणि संबंधीतांशी योग्य तो विचारविनिमय करून प्रसिद्ध केलेली होती आणि मप्रनि मंडळाने राज्य शासनास संबंधीत हितसंबंधीतांशी आणि विविध प्राधिकरणांशी सल्लामसलत करून, सदरहू मानके पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी शिफारस करून शासनास पाठविलेली आहेत ;

आता त्याअर्थी, हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम १७(१)(जी) अन्वये प्राप्त अधिकारांन्वये आता राज्यात वाहनांमध्ये वापराण्यात येणाऱ्या हॉर्न्स, सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यासाठीची मानके व त्यांचा वापर इत्यादी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली असून, ही अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून ही मानके व त्यांचा वापर राज्यभर लागू होईल :—

(१) सायरन्स किंवा मल्टीटोन हॉर्न्सचा वापर यापुढेही पोलीस व्हॅन्स, अँब्युलन्स आणि अग्निशमन दलाच्या गाड्या सोडून इतर वाहनांसाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ११९(१) आणि (३) नुसार प्रतिबंधीत असेल.

(२) तसेच, सायरन आणि मल्टी टोनसहीत इतर हॉर्न्स यांचा वापर शांतता क्षेत्रामध्ये आणि रहिवाशी क्षेत्रामध्ये, रात्रौ, ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील ५(अ)(१), नुसार फक्त तातडीच्या प्रसंगा व्यतिरिक्त, इतर वेळी प्रतिबंधीत असेल. तसेच शांतता क्षेत्रात पोलीस व्हॅन्स/अँब्युलन्स/अग्निशमन दलाची वाहने यांना निकडीची परिस्थिती वगळता इतरवेळी सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यांचा वापर त्यांना अनुज्ञेय नसेल.

(३) प्रत्येक वाहनांकरिता त्या वाहनांच्या प्रकारानुसार, पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ मधील परिशिष्ट-४ मधील भाग-ई मध्ये ठरवून दिलेल्या इंजिनाच्या ध्वनीच्या पातळीपेक्षा १० dB(A) पेक्षा जास्त ध्वनी मर्यादा उल्लंघन न करणारे हॉर्न्स, ज्यामध्ये सायरन्स आणि/किंवा मल्टीटोन हॉर्न्स यांचा समावेश आहे, बसविणे बंधनकारक असेल.

(४) हॉर्न बसविताना तो वाहनाच्या बॉनेटखाली बसविणे आवश्यक आहे.

(५) वर नमूद केलेलेल्या परिच्छेद १, २ आणि ३ व्यतिरिक्त राज्यातील खालीलप्रमाणे नमूद क्षेत्रे ही "नो हॉकिंग क्षेत्रे" म्हणून संबोधण्यात येतील व अशा क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक निकड वगळता इतर कोणत्याही वेळी वाहनांचा कोणत्याही प्रकाराचा भोंगा वाजविणे निषिद्ध राहील.

(अ) पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत जाहीर केलेली पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रे जसे माथेरान, महाबळेश्वर-पांचगणी, डहाणू इत्यादी.

(ब) महाराष्ट्र राज्यातील सर्व संरक्षित वने, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि घोषित केलेली राज्यातील हिल स्टेशन्स.

(क) कासचे पठार, कोयना वन्य जीव अभयारण्य, चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि राधानगरी अभयारण्य ही युनेस्कोने घोषित केलेली जागतिक प्राचिन वारसा स्थळे.

(ड) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या रहिवास विभागातील स्थानिक लोकांच्या सल्लामसलतीने निश्चित करून जाहीर केलेले "नो हॉकिंग क्षेत्रे" ज्यामध्ये स्थानिक नगरपालिका/महानगरपालिकांनी निश्चित केलेल्या वेळांशिवाय वाहनांचा भोंगा वाजविणे निषिद्ध असेल, अशी क्षेत्रे.

(६) सदरहू मानके व त्यांचा वापर इत्यादींची राज्यात अंमलबजावणी करण्याची जबाबदारी खालील विभागांची असेल.

परिवहन विभाग, गृह विभाग, महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग, जिल्हा अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा परिवहन व वाहतूक नियंत्रण प्राधिकारी, जिल्हा वन संरक्षण अधिकारी, नगरपालिका, नगरपरिषद यांचे मुख्य अधिकारी इ. त्यांच्या सबंधीत कार्यक्षेत्रात प्राप्त अधिकारांतर्गत या नियमांची अंमलबजावणी करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मेधा गाडगीळ,**
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

## ENVIRONMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 31st July 2014

*NOTIFICATION*

STANDARDS FOR HORNS, SIRENS AND/OR MULTI TONED HORNS FOR THE VEHICLES PLYING IN THE STATE OF MAHARASHTRA AND THEIR USE.

No. MIS/ 2014/CR 71/TC1.—Whereas, due to high density of people and vehicles and their movement in urban areas, level of noise gone abnormally high in cities and towns in the state.

And whereas, high level of noise pollution due to honking is also unsafe for ecologically fragile areas and natural surroundings in the state ;

And whereas, high level of noise pollution due to honking causes acute and chronic health impacts on the human population exposed in urban areas ;

And whereas, general resentment in public about increase in levels of Vehicular noise pollution due to honking which gets reflected in different media reports and court cases ;

And whereas, Hon'ble National Green Tribunal, Western Zone Bench, Pune in its order given in the application No. 36/2011, M.A. No. 202/2013 directed concerned agencies to notify standards for sirens and/or Multi-tone horns for the vehicles in the state ;

And whereas, it is obligatory on the State Government to take all measures for abatement of Noise including Noise eminating from vehicular movements (Blowing of Horns etc.) as per Rule 3(*3*) of the Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ;

And whereas, in exercise of the powers conferred u/s 17(*1*) (*g*) of the Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981, the Maharashtra Pollution Control Board (MPCB) in consultation with the Central Pollution Control Board (CPCB) has laid down the standards for siren/or multi tone horns and horns (sound signals) for necessary compliance by Motor Vehicles plying in the State of Maharashtra in compliance of the order passed by the Hon'ble National Green Tribunal, Western Zone Bench (WZ), Pune, dated 9th January 2013 in the Application No. 36/2011 ;

And whereas, the public notice inviting objections and suggestions was published by MPCB on 31st January 2014 and due deliberation were undertaken with the stake holders ;

And whereas, the MPCB recommended these standards to State Government after due consultation with the stake holders and concern authorities for further necessary action.

Now, Therefore, in exercise of the powers conferred u/s 17(*1*) (*g*) of the Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981 the following standards entitled "Standards for Horns, Sirens and/or Multi toned horns for the vehicles plying in the State of Maharashtra and their use" shall be implemented in the entire State of Maharashtra with immediate effect from the date of publication of this notification :—

(1) The sirens and /or multi tone horns shall be continued to be banned except for Police Van, Ambulance and Fire Brigades as prescribed under Rule 119(*1*) and (*3*) of the Central Motor Vehicles Rules, 1989.

(2) Use of sirens and multi-toned horns on vehicles should be continued to be prohibited in the silence zone and during night time in the residential zone as prescribed under the Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 except during a public emergency as per Rule 5A (*1*) of the Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000. It is further provided that in case, Police Van /Ambulance / Fire Brigade vehicle is not being used during the emergent public situation, the sirens and /or multi toned horns should not be used.

(3) The noise level of horns including siren/multi toned horns should not exceed 10 dB(A) louder than the noise levels of the vehicle engine sound for each category of the vehicles as specified under part-E of Schedule-VI of the Environment (Protection) Rules, 1986.

(4) The position of horn should be under the bonnet of the vehicle.

(5) Irrespective of the norms stipulated in 1, 2 and 3 above, following areas in the State of Maharashtra are declared as "No Honking Areas/Zones" where in any kind of honking from the motor vehicle is prohibited at any given time except during extreme emergency situations.

(*a*) Entire Eco-Sensitive Zone / areas like Matheran, Mahabaleshwar, Panchgani, Dahanu, etc. declared under Environment (Protection) Act, 1986 by Ministry of Environment and Forest (MoEF), New Delhi.

(*b*) Reserved and Protected Forest, National Parks, Sanctuaries, and notified hill stations in the State.

(*c*) World Heritage Sites such as Kass Plateau, Koyana Wildlife Sanctuary, Chandoli National Park, and Radhanagari Wildlife Sanctuary etc. as declared by UNESCO in the State.

(*d*) Residential areas, as identified after due public consultation will be declared as "No Honking Zones" by concern Local Body. No honking will be allowed in such areas except for the timings as stipulated by the Local Body.

(6) Authorities responsible for implementation of these standards and their use in the state shall be Transport Department, Home Department, Revenue and Forest Department, Urban Development Department, District Collector, District Forest Officer, Municipal Commissioner of Municipal Corporations, Chief Officers of Municipal Councils for their respective jurisdictions and powers.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MEDHA GADGIL,
Additional Chief Secretary to Government.